# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या आग्रही सुचनांना मुख्यमंत्र्यांचा हिरवा कंदिल
## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून व सिडकोच्या माध्यमातून होणार
## खारघर, कळंबोली व कामोठेमधील स्मशानभुमीचे आधुनिकीकरण

पनवेल (प्रतिनिधी) पनवेल तालुक्यातील सिडकोने नव्याने विकसीत केलेल्या खारघर, कळंबोली, व कामोठे शहरांमध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून आणि सिडकोच्या माध्यमातून स्मशानभुमींचे आधुनिकीकरण करण्यात येणार असून स्मशानभुमीत गॅस व डिझेलची शवदाहिनी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील खारघर, कामोठे, कळंबोली ही तीन शहरे झपाटयाने विकसीत होत असून सिडकोच्या मदतीने अनेक विकास प्रकल्प या तीनही ठिकाणी कार्यान्वित होत आहेत. या शहरामंध्ये दोन लाखांहून अधिक लोकसंख्या असून नागरिकांच्या वेगवेगळया समस्यांच्या सोडवूणीकीसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे आग्रही मागण्या केल्या होत्या.

त्यापैकी एक प्रमुख मागणी म्हणून महाराष्ट्रातील सर्व महत्वांच्या शहरांप्रमाणे खारघर, कळंबोली, कामोठेमध्ये सुध्दा प्रत्येक स्मशानभूमीत डिझेल व गॅसवर चालणारी शवदाहिनी सिडकोने उभारावी आणि लवकरात लवकर कार्यान्वित करावी ही असून या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय भाटिया यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना तावडतोब अंदाज पत्रके बनवून कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत तसेच कार्यवाही पूर्तीचा अनुपालन अहवाल तातडीने सादर करावा असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे स्मशानभूमीत अन्य आवश्यक व्यवस्थांनासुध्दा प्राधान्याने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. खारघर, कळंबोली, कामोठेच्या विकासाच्या अनेक टप्प्यापैकी हा महत्वाचा टप्पा असल्याने शहरातील नागरिकांकडून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यतत्परतेचे कौतुक होत असून सिडकोने कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत अशा अपेक्षाही व्यक्त होत आहेत.